**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत गाव मेंढा (लेखा), ता. धानोरा, जिल्हा गडचिरोली येथे ग्रामसभा यांना कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नेमणूक देऊन पथदर्शी प्रकल्प राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र. २५/रोहयो-१ ,
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १९ एप्रिल, २०११.

**वाचा :** १) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५
२) अनुसूचित जमातीची व अन्य परंपरागत वन निवासी (वन अधिकार मान्यता)अधिनियम, २००६
३) ग्रामीण विकास मंत्रालय, ग्रामीण विकास विभाग, भारत सरकार, यांचे अर्ध शासकीय पत्र क्र. टी-१०६०/५९/२०११-एमजीएनआरजीए-रिसर्च दिनांक ३० मार्च, २०१२

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ अन्वये ग्राम पंचायतीने कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम करावयाचे आहे. तथापि, गाव - मेंढा (लेखा), ता. धानोरा, जि. गडचिरोली या आदिवासी गावाच्या ग्रामसभेस वन अधिकार अधिनियम २००६ अन्वये वन विभागाची जमीन हस्तांतरीत करण्यात आली आहे. अशाप्रकारे ग्रामसभेस सर्व गाव सांभाळण्याचे अधिकार देण्याची महत्वाची घटना प्रथमच घडली आहे. तेंव्हा मेंढा (लेखा), तालुका धानोरा, जिल्हा गडचिरोली या गावामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत पथदर्शी काम घेण्याबाबत या गावातील ग्रामसभेस अधिकार देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदयातील कलम २ (ग) अन्वये ग्रामपंचायत कार्यान्वयीन यंत्रणा आहे.

२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ व पेसा कायदा यांची सांगड घालून मेंढा (लेखा) ता. धानोरा, जिल्हा गडचिरोली या गावातील ग्रामसभेस प्रायोगिक तत्वावर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतर्गत कामे करण्यासाठी कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

३. मेंढा (लेखा) ता. धानोरा, जिल्हा गडचिरोली गावच्या ग्रामसभेने त्यांच्या गावात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत जलसंधारणाची कामे करण्याची विंनती केली आहे. तद्नुसार ग्रामसभेमार्फत गावात प्रायोगिक तत्वावर राबविण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांना देण्यात येत आहेत. त्यांनी त्यांचे स्तरावर उपरोक्त पथदर्शी प्रकल्प राबविण्याच्या अनुषंगाने तात्काळ खालील समिती स्थापन करावी.

| | |
|---|---|
| १) जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| २) सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद) | - सदस्य |
| ३) सरपंच, ग्रामपंचायत मेंढा (लेखा) ता. धानोरा, जिल्हा गडचिरोली | - सदस्य |
| ४) श्री. सुबोध कुळकर्णी, तंत्रज्ञ. - - | - सदस्य |

४. सदर योजना राबवितांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोहयो हमी योजनाच्या विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणे अनिवार्य राहील.

५. जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांना उपरोक्त समितीमध्ये तांत्रिक अधिका-यांचा समावेश करण्याची मुभा राहील.

६. सदर पथदर्शी प्रकल्प सेवाभावी संस्थाचे देखरेखीखाली /तांत्रिक मागदर्शनामार्फत (उदा. बायफ) सदर कामे करण्यास व त्यांबाबतचा खर्च ६% प्रशासकिय खर्चातून भागविण्यास अनुमती राहील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०१२०७२३१०५७३८४४१००१ हा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(व्ही. गिरीराज)**
**प्रधान सचिव (रोहयो) नियोजन विभाग**

प्रति,

मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
सर्व अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य, पुणे.
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे.
प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे.
संचालक, भुजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
उप सचिव (रोहयो समिती), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.
महासंचालक, अर्थ व सांखिकी संचालनालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई. (प्रसिध्दी करीता),
विभागीय कृषि सहसंचालक,ठाणे,पुणे,कोल्हापूर,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर, लातूर.
सर्व अधीक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/पुणे/ कोंकण वृत्त ठाणे.
सर्व मुख्य वन संरक्षक/सर्व उप वनसंरक्षक.
सर्व विभागीय वन संरक्षक/सर्व विभागीय मृदसंधारण अधिकारी.
सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व कार्यासन अधिकारी, रोहयो प्रभाग व जलसंधारण विभाग/निवडनस्ती / सारग्रंथ रोहयो-१